आर.सी.सी क्र.७९०/२०२५
सरकार विरुध्द. हर्षकुमार
निशाणी क्र.१८९/क पुढे चालु...

दिनांक १७.०३.२०२६ रोजी –

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची उलटतपासणी शपथेवर सुरु आरोपी क्र.२ व ३ करिता विधिज्ञ श्री. ए. डी. मुळे यांचे द्वारा...**

**आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. मुळे यांनी आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारला.**

**आरोपी क्र.८ व ९ तर्फे विधीज्ञ श्रीमती. सिमा माळोदे यांनी आरोपी क्र.८ व ९ करिता उलटतपास घ्यावयाचा नाही असे सांगितले.**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची उलटतपासणी शपथेवर सुरु, आरोपी क्र.१० व ११ करिता विधिज्ञ श्री. एम. बी. दळवी यांचे द्वारा...**

मी सन २०२४ मध्ये विभागीय क्रिडा संकुल औरंगाबाद येथे कर्तव्यावर हजर झाले. हे म्हणणे खरे आहे की, तत्पुर्वी मी बीडमध्ये जिल्हा संघटक या पदावर कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी स्काऊट व गाईड या विभागामध्ये कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे उपसंचालक, जिल्हा संघटक स्काऊट व गाईड हे पद नाही. आरोपी क्र.१० हे मला कार्यालयात वरिष्ठ का कनिष्ठ हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० चे कार्यालयातील काम व माझे कार्यालयातील काम हे वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० चे कार्यालयातील काम वेगळे असल्यामुळे त्यांचे काम मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० यांना कार्यालयामार्फत काय काम दिले व त्यांची कर्तव्य सुची काय आहे याची मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० हा क्रिडा संकुलच्या विदयार्थ्यांना तलवारबाजी या खेळयाचे प्रशिक्षण देतो व ते प्रशिक्षक देखील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः बँकेत जावुन आरोपी क्र.१० याने काही व्यवहार केले आहेत याची शहानिशा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० याने बँकेत व्यवहार केला असे दाखवणारा कोणताही कागद मला दाखवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१० याने त्याच्या हस्ताक्षरात नि.क्र.१७५ रोकड वहीत नोंद

केली असे मला काही दाखवण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७५ रोकड वही स्वतः न्यायालयात तपासलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा गुन्हा जवाहर नगर पोलीस स्टेशनला दाखल झाला याची मला पहिल्यांदा दिनांक २२.१२.२०२४ रोजी माहिती मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.१२.२०२४ रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशनमधील कर्मचा–याने माझ्याकडे येवुन सदर प्रकरणा बाबत काही चौकशी केली नाही. दिनांक २२.१२.२०२४ रोजी जवाहर नगर पोलीसांनी माझ्या कोणत्याही लिहिलेल्या कागदावर सही घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतःहुन क्रिडा संकुलाच्या संबंधी कोणताही कागद अथवा कोणतेही रजिस्टर अथवा वस्तु पोलीसांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.१२.२०२४ रोजी पोलीसांनी क्रिडा संकुलमध्ये सदर प्रकरणासंबंधी कोणतेही कागद मला दाखवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणा संबंधित सर्व लिखापडी पोलीसांनी केली, मी त्यांना काही कथन करुन लिहिण्यासाठी सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.१२.२०२४ रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशनला पोलीस सर्व रजिस्टर घेवुन तसेच मला देखील घेवुन आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या वस्तुंची मी पोलीस स्टेशनला जावुन शहानिशा केलेली नाही. माझे टिपण अशोक अवचार या पोलीस अधिका–याने नोंदवले होते. माझे टिपण नोंदवतांना माझ्यासोबत कोणीही नव्हते. माझे टिपण नोंदवतांना त्यांनी मला प्रश्न विचारले व मी त्यांना उत्तर दिले या पध्दतीने लिहुन घेण्यात आले. मी या प्रकरणा बाबत स्वतःहुन काही माहिती पोलीस अधिका–यांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.११ नागेश डोंगरे यांना मी वैयक्तीकरित्या ओळखत नाही. पोलीसांनी माझे टिपण नोंदवले व त्यानंतर पंचनामे करण्यात आले यादरम्यान २५ – २६ दिवसांचा कालावधी लागलेला आहे. सदर कालावधीत माझी व पोलीसांची भेट दिनांक २८.१२.२०२४ रोजी झाली होती. दिनांक २८.१२.२०२४ रोजी माझी पोलीसांशी भेट आर्थिक गुन्हे शाखा विभागात साधारण दुपारी ०४.०० ते ०४.३० च्या दरम्यान झाली होती. दिनांक २८.१२.२०२४ रोजी पोलीसांशी माझी त्यादिवशीची पहिली भेट होती. दिनांक २८.१२.२०२४ रोजी टिपण नोंदविण्यासाठी म्हणुन मला पोलीसांनी नोटीस दिली नाही. दिनांक २८.१२.२०२४ रोजी मी आर्थिक गुन्हे शाखेत साधारण एक तास ते सव्वा तास होते. दिनांक २८.१२.२०२४ रोजी मी आर्थिक गुन्हे शाखेत मी लिहिलेल्या कागदावर सहया केल्या नाही. दिनांक २८.१२.२०२४ मी कामासाठीच आर्थिक गुन्हे शाखेत गेले होते. दिनांक २८.१२.२०२४ रोजी मी आर्थिक गुन्हे शाखा येथे एक तास ते सव्वा तास हजर असतांना मी पंचनाम्यावर सहया केल्या असे साक्षीदाराने पुन्हा सांगितले. पंचनामा पोलीसांना तयार केला, त्यामध्ये मजकुर काय लिहायचा ते मी पोलीसांना सांगितले नाही. दिनांक

२८.१२.२०२४ रोजी मी एकाच पंचनाम्यावर एकच सही केली होती, किती सहया केल्या ते मला आता आठवत नाही. पंचनामा कशाचा आहे व त्यात काय लिहिले आहे हे मी पोलीसांना त्यावेळी विचारले होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्थिक गुन्हे शाखेत मला त्यादिवशी जप्त करण्यात आलेल्या वस्तु दाखवण्यात आल्या होत्या. पोलीसांनी ज्या वस्तु जप्त केल्या होत्या त्या त्याच आहेत हे ठरविण्यासाठी त्या वस्तुंवर विशेष अशी खुण केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या वस्तु हया त्याच आहेत हे पण मी पोलीस स्टेशनला जावुन साक्ष देण्यापुर्वी तपासलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.१२.२०२४ रोजी मी दिलेला जबाबामध्ये कोणताही पंचनामाचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुत प्रकरणाबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री. संजय सबनीस यांनी मला सांगितले म्हणुन मी फक्त सहया केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना माझे दिलेले टिपण प्रश्न व उत्तर स्वरुपाचे मला दाखवले नाही. माझे टिपण मला दाखवले, हे प्रश्न उत्तर स्वरुपातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी संजय सबनीस यांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.१० व ११ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
|---|---|
| RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR — Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.17 17:25:35 +0530 | RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR — Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.17 17:25:41 +0530 |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जाबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– १७/०३/२०२६.